# एका कुणब्याची कहाणी : पोशिंदा

१) कवितेचा प्रेरणास्त्रोत : ग्रामीण साहित्य प्रवाह

**मी त् जगाचा पोशिंदा, रात-दिसाचा राबतो**
**हात जोडून नभाला, दान पाण्याचे मागतो**

जगाला पोसण्यासाठी नभाला पाण्याचं दान मागणाऱ्या पोशिंद्याची व्यथा मांडणारी कवी सोमनाथ पवारांची पहिलीच कविता 'पोशिंदा- मागतो' या आंतरविरोधी ताणामुळे आपल्याला आकर्षित करून घेते. पोशिंद्याचे मागणे कृतिशून्यतेमुळे नसून रात-दिसाचे राबणे चालले असूनही तो परावलंबी आहे याचे सूचन येथे होते. श्रमसंस्कृतीतून आलेली नम्रता येथे स्पष्टपणे जाणवते. कदाचित कृषिसंस्कृतीच्या परावलंबित्वामुळे ही नम्रता विकसित झाली असावी. पहिल्या ओळीत जाणवणारे 'मी'चे अस्तित्व, त्याची कर्तबगारी येथे नम्र होते याचे प्रमुख कारण शेतकऱ्याची आणि एकंदर कृषी-संस्कृतीची निसर्गसन्मुखता. कृषिजीवन निसर्गावर अवलंबून असते. पाऊस योग्य वेळी योग्य प्रमाणात पडला म्हणजे निसर्गाने साथ दिली, कुठल्याही प्रकारची नैसर्गिक आपत्ती आली नाही तर कृषिजीवन आनंदीत होते. याउलट नैसर्गिक आपत्तीमुळे ते कोलमडून पडते. संपूर्ण जगाचे पोषण करण्याचे सामर्थ्य असूनही शेवटी दुसऱ्याकडे हात जोडून दान मागण्याचे नशिबी येते. ही फक्त भारतीय शेतकऱ्याचीच नव्हे तर कमी-अधिक प्रमाणात जगातील एकूण एक शेतकऱ्याची व्यथा येथे प्रकट होते.

निसर्गाप्रमाणेच 'शासनव्यवस्था' या घटकानेही शेतकऱ्याला परावलंबी बनविलेले आहे. भांडवली व्यवस्थेचे छुपे समर्थन करणारे राज्यकर्तेही शेतकऱ्याच्या ऱ्हासास कारणीभूत ठरत आहे. ही सन १९७५ नंतर शेतकऱ्याला आलेली जाण,

**नको मला फुकटचं, नको काही सवलत**
**दाम मिळो घामाचंच, हिच माझी ऐपत**

या ओळींतून व्यक्त होते. सोमनाथ पवारांची कविता मुख्यत्वेकरून निसर्ग व शासनव्यवस्था यांच्या दुष्टचक्रात आडकलेल्या कष्टकरी शेतकऱ्याची कहाणी आहे. एकोणिसाव्या शतकात शेतकऱ्यांच्या शोषणाला वाचा फोडणाऱ्या व त्यांच्या दुःखाला अक्षररूप देणाऱ्या महात्मा जोतिराव फुले यांच्या साहित्यात या लेखनाचा प्रेरणास्त्रोत आहे. त्याचबरोबर ग्रामीण जाणिवेतून लेखन करणारे कवी आनंद यादव, कवी ना. धो. महानोर, कवी इंद्रजित भालेराव यांसारख्या कवींच्या संस्कारातून हा स्त्रोत परिपुष्ट होत गेलेला दिसतो.

**२) पावसाचे शेतकऱ्याच्या जीवनातील स्थान :** काळी कसदार शेती पाऊस पडल्यावर बहरते. तिच्यातील सृजनशीलतेला जागवणारा पाऊस रुसला तर मात्र पाण्यावाचून ती कुढते 'सारा सरला हंगाम आत कोरडीच माती' तिचा श्वास कोंडतो. दुष्काळ पडून शेतकऱ्याचं मन करपून जाते म्हणून कवी म्हणतो-

**नाही दिसत हिर्वाई, गेलं करपून रान**
**झालं शिवारं ओसाड, माझं जळतंय मन**

पिकाचा पालापाचोळा पाहताना दुःख मरणाच्या कळा तो सोसतो. त्याचवेळेला आपले सोबती असलेली मुकी जित्राब, त्याच्या दैनंदिन कृषिकर्मात त्याला मदत करणारी जनावर, त्यांचे होणारे हाल त्याला बघवत नाही. शासनव्यवस्था छावण्या उभ्या करतं; परंतु तिथली अवस्थाही त्याच्या दुःखात भरच टाकते.

**नाही खाया पोटभर । गेलं खपाटीला पोट**
**उभं राहून रांगेत । पाण्याचा मिळे घोट**




प्रा. डॉ. प्रमोद आंबेकर
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मनमाड,
नाशिक-४२३१०४
मोबाईल : ९९२२७१३८२५


**"पोशिंद्याचे मागणे कृतिशून्यतेमुळे नसून रात-दिसाचे राबणे चालले असूनही तो परावलंबी आहे याचे सूचन येथे होते. श्रमसंस्कृतीतून आलेली नम्रता येथे स्पष्टपणे जाणवते. कदाचित् कृषिसंस्कृतीच्या परावलंबीत्वामुळे ही नम्रता विकसित झाली असावी."**



पोशिंदा, सोमनाथ पवार, कादबा शिवार प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती : एप्रिल २०१३.




Scanned by CamScanner